जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ११.१०.२०२५**

'' वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक दलाल महिला आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ''

दिनांक १०/१०/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली गोरडे यांना माहिती मिळाली की, बाईक सुरज प्लाझा, साईबाबा विहार कॉम्प्लेक्स, द वेव्हज् कॅफे, आनंदनगर, घोडबंदर रोड, ठाणे पश्चिम या ठिकाणी एक दलाल महिला काही असहाय्य मुलींना फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलवणार आहे. सदर मिळालेल्या माहिती वरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने सापळा लावून एक दलाल महिलेस ताब्यात घेवुन तिच्या रखवालीत असलेल्या ०२ पिडीत मुलींची सुटका केली आहे.

सदर प्रकाराबाबत दलाल महिला आरोपीविरुध्द कासारवडवली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नंबर । ९०६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १४३ (१),१४३ (३),३ (५) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन महिला आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदर कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री.रविंद्र दौंडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वपोनिरी/वैशाली गोरडे, मपोउपनि/स्नेहल शिंदे, श्रेणीपोउपनि/वालगुडे, श्रेपोउपनिरी/क्षिरसागर, पोहवा/सुवारे, पो.हवा./व्ही.आर.पाटील, पोहवा/नाईक, पोहवा/सुवारे, पोहवा/के.बी.पाटील मपोअंम/खरात, थोरात, चापोअंम/निकम यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर